# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.05.2025** **वार- बुधवार**

---

**<u>नारळीकर</u>**

जागतिक ख्यातीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी, आंतर विद्यापीठ खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र केंद्र अर्थात आयुका इथे त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनसाठी ठेवण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंत्यदर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले. शासनाच्यावतीने, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, यासह अन्य मान्यवरांनीही पुष्पचक्र अर्पण करून डॉक्टर नारळीकर यांना श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी पोलीस दलाने सलामी, शोकशस्त्र तसेच बाजूशस्त्र सलामी दिली. तसंच, दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून डॉ. नारळीकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉक्टर नारळीकर यांचं काल पुण्यात निधन झालं होतं.

**<u>बुलेटट्रेन</u>**

पुणे जिल्ह्यातील देहू जवळील श्री क्षेत्र भंडारा डोंगर हे वारकरी संप्रदायाचं श्रद्धास्थान असून, त्याला धार्मिक महत्व आहे; त्यामुळे प्रस्तावित मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेनचा मार्ग डोंगराला बोगदा पाडून करण्यात येणार नाही असं आश्वासन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलं असल्याची माहिती

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली आहे. मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार, या ट्रेनचा प्रस्तावित मार्ग या डोंगराला बोगदा पाडून करण्यात येणार होता. याबाबत वारकरी संप्रदायाने चिंता व्यक्त केली होती. त्या पार्श्वभूमीवर, खासदार श्रीरंग बारणे यांनी भंडारा डोंगर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांच्यासह रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची दिल्लीत भेट घेऊन, प्रस्तावित मुंबई-पुणे-हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाचा मार्ग वळविण्याची विनंती केली होती.

**<u>सफाईकर्मचारी</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील राज्य सफाई कर्मचारी आयोगाची बैठक नुकतीच पार पडली. राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. महानगरपालिका आस्थापनातील सफाई कर्मचाऱ्यांसोबत कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी महानगरपालिका प्रशासनाने घ्यावी, असे डागोर यांनी यावेळी सांगितले. बैठकीमध्ये सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी, लाभार्थी यांनी विविध समस्या मांडल्या. या समस्यांचे निराकरण तातडीने महानगरपालिका प्रशासनाने करण्याच्या सूचना यावेळी डागोर यांनी दिल्या.

**<u>साथरोग</u>**

पुणे शहर आणि परिसरात सध्या पावसाळी वातावरण असल्यामुळे साथ रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. यंदा शहरात डेंग्यूचे १२१ संशयित रुग्ण आढळले असून, त्यांपैकी ८ जणांना डेंग्यूचे निदान झाले आहे. चिकुनगुन्याचेही ८ आणि हिवतापाचे १८ रुग्ण आढळून आले आहेत. डासांची उत्पत्तीस्थानं आढळल्याप्रकरणी आरोग्य विभागाने १८ घरमालकांसह कार्यालयं आणि महाविद्यालयांना नोटीस बजावली असून, त्यांच्याकडून ५९ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. नागरिकांनी योग्य ती काळजी घेण्याचं आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आलं आहे.

**<u>पिं-चिं-जाहिरातफलक</u>**

गेल्या काही दिवसांपासून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे त्यामुळे जाहिरात फलक अर्थात होर्डिंग पडण्याच्या घटनाही घडत आहेत. यावर खबरदारीचे उपाय म्हणून महापालिकेने यापूर्वीच सर्व जाहिरातदारांना मान्सुनपूर्व कालावधीतच खबरदारीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यात, सर्व जाहिरात फलकांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी करणे. फलकांच्या लोखंडी सांगाड्यास गंज लागला नसल्याची खात्री करावी. धोकादायक फलक स्थितीत तात्काळ निष्कासित करावा या सूचनांचा समावेश आहे. तसंच नागरीकांनी या मान्सून कालावधीत अशा जाहिरात फलकाच्या खाली अथवा जाहिरात फलकाच्या आसपास थांबण्याचे टाळावे अथवा आपली वाहने लावू नयेत असं आवाहन परवाना विभागाचे उप आयुक्त राजेश आगळे यांनी केले आहे.

**<u>अवकाळी</u>**

गेल्या पंधरा दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे २३ जिल्ह्यांमधील तब्बल २३ हजार ३३१ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. कृषी विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार 6 ते 20 मे पर्यंत राज्यातील २३ जिल्ह्यांमध्ये २३ हजार ३३१ हेक्टरवरील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पिकांमध्ये केळी, आंबा, डाळिंब, पपई, चिकू तसेच कांदा, भाजीपाला, बाजरी, मका, लिंबू, संत्रा, उन्हाळी भात या पिकांचा समावेश आहे.

सर्वाधिक नुकसान अमरावती जिल्ह्यात झाले असून, येथील अचलपूर, भातकुली, चांदूरबाजार, चिखलदरा या चार तालुक्यांमध्ये १० हजार ८ शे ८८ हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्यासाठी महसूल आणि कृषी विभागातील कर्मचा-यांकडून करण्यात येत असून, याचा सविस्तर अहवाल लवकरच राज्य सरकारला सादर करण्यात येणार असल्याची माहिती पुणे कृषी विभागाने दिली आहे.

**<u>पडझड</u>**

काल पुणे शहर परिसरात झालेल्या मुसळधार पावसानंतर, अग्निशमन दलाकडे काल दुपारपासून आज सकाळी १० वाजेपर्यंत ५४ झाडं पडल्याची तर दोन  ठिकाणी भिंत पडल्याची नोंद करण्यात आली. धानोरी येथे एक होर्डिंग कोसळले मात्र, यात कोणीही जखमी झाल्याचं वृत्त नाही अशी माहिती अग्निशमन दलाने दिली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल ३५ आणि किमान २३ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. दिवसभर आकाश अंशतः ढगाळ होत. उद्या देखील अशाच स्वरूपाचं हवामान असण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**